साप्ताहिक
# परळी परिसर
* परळी वैजनाथ * मंगळवार, दि. १७ सप्टेंबर २०२४ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# शेतकऱ्यांनी उत्पन्न वाढीसाठी शेतीबरोबरच पशुपालन या जोडधंद्याकडेही वळावे - कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे

## सिरसाळ्यातील शादीखान्याचे लोकार्पण व महिला सभागृहाचे भूमिपूजन



परळी वैद्यनाथ (बातमीदार):- परळी मतदारसंघात शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी आपण मागेल त्याला शेततळे, सिंचन विहिरी या सर्वाधिक मंजूर केलेल्या आहेत. त्याचबरोबर शेतीच्या सोबतीने उत्पन्न वाढीसाठी पशुपालनाकडेही जोडधंदा म्हणून बघणे व पशुपालन करणे गरजेचे असल्याचे मत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील मोहा येथे पशु वैद्यकीय दवाखान्याच्या लोकार्पण प्रसंगी बोलताना व्यक्त केले आहे.

बीड जिल्ह्यात लंपी आजारावर नियंत्रण असेल किंवा पशुवैद्यकीय दवाखान्यांना सुविधा मिळवून देण्याचा विषय असेल आपण २५ कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध करून दिलेला असून परळी तालुक्यात सुद्धा सुमारे सहा कोटी पाच लक्ष रुपये इतका निधी आतापर्यंत उपलब्ध करून देण्यात आला आहे. जनावरांच्या सोनोग्राफी व एक्स-रे साठी पशुपालकांना पूर्वी इतर जिल्ह्यांमध्ये जावे लागायचे मात्र आता परळीमध्ये सुद्धा तीन अध्याय सोनोग्राफी मशीन व एक्स-रे मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. यावर्षी सोयाबीनला चांगला भाव मिळणार असून परळी विधानसभा मतदारसंघातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस घालायची देखील अडचण भासू देणार नाही असा शब्द यावेळी धनंजय मुंडे यांनी बोलताना दिला.

यावेळी माजी आमदार आर. टी. देशमुख, परळी पंचायत समितीचे उपसभापती विष्णुपंत देशमुख, माऊली तात्या गडदे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुशांत पवार, मोहाच्या सरपंच सौ रुक्मिणी शेप, शैलेंद्र पोटभरे, माणिक सातभाई, प्रकाश कावळे, सरपंच दराडे त्याचबरोबर जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ.विजय देशमुख, डॉ.कदम, डॉ.प्रकाश आघाव, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांसह मोहा व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते. आर टी जिजांनी सांगितले पंडित अण्णा मुंडे व धनंजय मुंडेंच्या कामातील साधर्म्य यावेळी बोलताना माजी आमदार आर टी देशमुख यांनी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे व स्वर्गीय पंडितांना मुंडे यांच्या कामाच्या पद्धतीवरून धनंजय मुंडे यांच्या कामाच्या पद्धतीशी त्यांचे कसे साधर्म्य आहे याबाबतच्या आठवणी जागे केल्या.

मोहा गावातील जिल्हा परिषद शाळा व अन्य काही विकास कामांचे पंडित अण्णांच्या हस्ते काही वर्षांपूर्वी भूमिपूजन झाले व पुढील काही महिन्यात पंडित अण्णांच्या हस्ते त्यांचे लोकार्पणही झाले. त्याच्यात शेजारच्या जागेमध्ये पंडित अण्णांचे सुपुत्र धनंजय मुंडे यांच्या हाताने पशुवैद्यकीय दवाखान्याचे भूमिपूजन झाले व काही महिन्यातच त्याचे लोकार्पणही झाले. या भागात जी काही विकास कामे झाली ती स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे, स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे तसेच पुढच्या पिढीत धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून झाली, असे आर टी देशमुख यावेळी बोलताना म्हणाले.

**सिरसाळ्यातील पशु वैद्यकीय दवाखाना, शादीखान्याचे लोकार्पण व महिला सभागृहाचे भूमिपूजन:-** सिरसाळा येथे धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे लोकार्पण श्री मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले. तसेच त्यानंतर सिरसाळ्यात उभारण्यात आलेल्या शादी खान्याचे ही लोकार्पण श्री मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले, यावेळी शादी खान्याच्या शेजारी उभारण्यात येत असलेल्या महिला भवनाचेही भूमिपूजन करण्यात आले, तसेच हे काम दर्जेदार पद्धतीने निर्धारित वेळेत पूर्ण करून घेण्याच्या सूचना धनंजय मुंडे यांनी संबंधितांना केल्या आहेत.

याप्रसंगी वैद्यनाथ कारखान्याचे व्हाईस चेअरमन चंद्रकांत कराड, राजाभाऊ पौळ, जानेमिया कुरेशी, राम किरवले, माणिकराव पौळ, माधवराव नायबळ, वसंत राठोड, फेरोज पठाण, संतोष पांडे, अक्रम पठाण, देवराव काळे, सतिश काळे, नदीम शेख, रफिक बागवान, निहाल मणियार, कल्याण काळे, श्रीराम बडे, अक्षय दळवी, विठ्ठल गित्ते, नय्युम शेख, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, श्री काळे, डॉ.कदम, डॉ.आघाव आदी उपस्थित होते. ***

# परळी पालिकेत गेल्या सात वर्षात साडेचारशे कोटी रुपयांचा भ्रष्टाचार : राजेभाऊ फड



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी वैजनाथ येथील नगर पालिकेला गेल्या साडेसात वर्षात विविध योजनांसाठी सुमारे नऊशे कोटी रुपयांचा निधी आला असून त्यापैकी साडेचारशे कोटी रुपये अधिकारी-नेत्यांनी संगनमताने हडप केले असून पालिकेतील या भ्रष्ट कारभाराच्या विरोधात आपण मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे ज्येष्ठ युवा नेते व तालुक्यातील कन्हेरवाडीचे सरपंच राजाभाऊ फड यांनी येथे रविवारी (ता.१५) घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

श्री फड यांच्या परळीतील निवासस्थानी ही पत्रकार परिषद झाली. श्री फड म्हणाले या पालिकेत विविध योजनांसाठी प्राप्त झालेल्या विकास निधी ज्या त्या विकास कामांसाठी वापरला गेला नाही. तो इतर विकास कामासाठी वापरला आहे. निधीची फिरवा फिरवी करणारी परळी पालिका राज्यातील एकमेव पालिका असल्याचा दावा श्री फड यांनी केला. परळी पालिकेतील विविध विकास कामाच्या निविदा ठराविकच कंत्राटदारांना भरता येते. इतर कंत्राटदारांना ती भरता येत नाही अशी व्यवस्था केली गेली आहे. निविदा भरण्यासाठी साईड चालत नाही. पालिकेची विकास कामे ठराविक गुत्तेदारांना दिली जातात. येथे सेवकाला टेंडर भरता येते पण गुत्तेदाराला नाही असा आरोप करुन श्री फड म्हणाले परळी तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयात मनमानी व भ्रष्टाचार बोकावला आहे. त्यास सत्ताधारी पक्षाचे नेते व त्यांचा कारभार जबाबदार आहे. तालुक्यात वाळू, राख, मुरुम याच्या सर्रास होणाऱ्या बेकायदा उपाशस यांचेच आशीर्वाद आहेत. भरमसाठ निधी येऊनही अनेक योजनेची कामे अर्धवट आहेत. परळी शहरातील शंभर कोटी रुपयांच्या गटार योजनेचे काम बोगस झाले असून ही योजना रखडलेली आहे. यातही भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप करुन श्री फड यांनी परळी अनेक योजना कागदावरच असल्याचे सांगितले.

बीड जिल्ह्यात बोगस पीकविम्याचे रॅकेट असून पीक विम्यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. यापूर्वी जिल्ह्यातील १६ ऑनलाईन केंद्रावर कारवाई झाली आहे. या केंद्राना पालकमंत्र्याचे संरक्षण आहे. या प्रकरणी चौकशी करुन दोषीवर कडक कारवाई झाली पाहिजे असेही श्री फड म्हणाले.



# वैद्यनाथ बँकेची सर्वसाधारण सभा उत्साहात

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. प्रीतम मुंडे यांच्या उपस्थितीत बँकेचे अध्यक्ष विनोद सामत यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यनाथ प्रतिष्ठानच्या सभागृहात रविवारी (दि.९) पार पडली.

वैद्यनाथ प्रभू, माता सरस्वती, महालक्ष्मी, गणपती तसेच बँकेचे श्रध्दास्थान लोकनेते गोपिनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खर्चे यांनी सभेचे प्रास्ताविक केले. सुरवातीस बँकेचे सभासद व शहीद जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यानंतर श्री. खर्चे यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसचे व मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन केले. बँकेचे अध्यक्ष विनोद सामत यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून वैद्यनाथ बँकेच्या प्रगतीचा आढावा व वार्षिक सर्वसाधारण सभेचे विषय सभेत मांडले. २०२३-२४ चा आर्थिक वर्षाचा अहवाल मांडतांना मार्च २०२४ अखेर बँकेचे सभासद ४५,५३२ असून बँकेच्या ठेवी ७२९ कोटी १७ लाख व कर्ज ४२४ कोटी ६ लाख आहेत. बँकेने केलेली गुंतवणूक ३६१ कोटी २८ लाखाची आहे.

यावेळी व्हाईस चेअरमन रमेशराव कराड, संचालक नारायणराव सातपुते, प्रकाशराव जोशी, प्रविण देशपांडे, महेश्वर निर्मळे, संदिप लाहोटी, प्रा. दासू वाघमारे, अनिल तांदळे तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद खर्चे, सरव्यवस्थापक एस.पी. खंदाडे आदी हजर होते. ***

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार ध्वजारोहण

बीड, (जिमाका): मराठवाडा मुक्ती संग्रामदिनानिमित्त मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते पोलीस मुख्यालय मैदान, येथे सकाळी ९.०० वाजता मुख्य ध्वजारोहण सोहळा होणार आहे. तसेच ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभापूर्वी शहरातील स्मृतिस्तंभ, प्रियदर्शनी उद्यान, नगर रोड, येथे सकाळी ८.२५ वाजता हुतात्म्यांना मानवंदना व पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम होणार आहे. येथे पालकमंत्री स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे कुटुंबिय तसेच शहिद सैनिकांचे वारस यांच्या भेटी घेतील. यासह मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे सकाळी ७.१५ वाजता अपर जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. जिल्हाधिकारी यांचे हस्ते त्यांच्या निवासस्थानी सकाळी ७.२५ वाजता तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, येथे सकाळी ८.०० वाजता ध्वजारोहण होणार आहे.

## बीड जिल्ह्यात ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी बुधवारी

बीड, (जिमाका):- बीड जिल्ह्यात ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी बुधवारी दि. १८ सप्टेंबर २०२४ ला आहे. महाराष्ट्र शासनाचे शासन अधिसूचनेतील तरतुदीनुसार मुस्लिम बांधवाना ईद-ए-मिलाद हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी तसेच सामाजिक सलोखा व कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या हेतुने बीड जिल्हासाठी सोमवार, दिनांक १६ सप्टेंबर, २०२४ करिता घोषित केलेली ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी रद्द करून ती बुधवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२४ या दिवशी जाहीर करण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे. ***

# अजय-अतुल यांनी दरवर्षी गणेशोत्सवात परळीत यावे : ना.मुंडे

परळी वैद्यनाथ (बातमीदार):- जागतिक दर्जाचे व आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक असलेले गायक, गीतकार व संगीतकार अजय गोगावले व अतुल गोगावले हे परळीत दुसऱ्यांदा आले असून मागच्या वेळी त्यांनी ट्रॅक परफॉर्मन्स दिला होता तेव्हा आपण त्यांना त्यांच्या संपूर्ण संगीतकारांच्या व पार्श्वगायकांच्या टीमसह लाईव्ह कॉन्सर्ट करण्याची विनंती केली होती व आज त्यांनी ती विनंती पूर्ण केली. यापुढे अजय-अतुल यांनी त्यांच्या जगप्रसिद्ध संगीतकार व पार्श्वगायकांच्या संपूर्ण टीमसह प्रत्येक वर्षी परळीच्या गणेशोत्सवात यावे, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी सुप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय-अतुल यांना केली व त्यांनी ती लगेचच मान्य केल्याचे घोषित केले. नामदार धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात काल सायंकाळी जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय-अतुल यांची ५० संगीतकार व पार्श्वगायकांच्या समूहासह लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली होती. यावेळी लल्लाटी भंडार, देवा श्री गणेशा, याड लागलं, तुझ्या प्रीतीचा विंचू मला चावला यांसारख्या सुप्रसिद्ध अशा एकापेक्षा एक सरस गीतांनी अजय-अतुल यांनी



परळीकरांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.

दरम्यान धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठानच्या वतीने अजय-अतुल यांच्यासह त्यांच्या टीमचे फेटा बांधून, शाल व सन्मानचिन्ह देऊन स्वागत केले. यावेळी बोलताना धनंजय मुंडे यांनी अजय गोगावले यांना त्यांचे प्रसिद्ध 'उमगाया बाप रे' हे गीत गाण्याची फर्माईश केली, त्याचबरोबर अजय गोगावले यांनी त्यांची ती फर्माईश पूर्ण करत त्यांच्या खास शैलीत उमगाया बाप रे हे गीत गाऊन अगदी भावनिक वातावरण निर्माण केले.

गणेशोत्सवात उभारण्यात आलेले स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे सभागृह संपूर्णपणे भरून त्यापेक्षाही जास्त लोक आजूबाजूला व रस्त्यावर उभे राहून या संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद घेत होते. जवळजवळ चार तास चाललेल्या या लाईव्ह कॉन्सर्ट मध्ये एकही माणूस इकडचा तिकडे उठून गेला नाही.

# परळी मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढणारच : राजेभाऊ फड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आपण प्रवेश करणार असून महाविकास आघाडीकडून परळी विधानसभेची निवडणूक लढवणार असल्याची माहिती ज्येष्ठ युवक नेते व परळी तालुक्यातील कन्हेरवाडीचे सरपंच राजाभाऊ फड यांनी रविवारी (दि.१५) येथे पत्रकारांना दिली.

बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार या मुद्यावर आपण ही निवडणूक लढवणार आहोत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडे आपण परळी विधानसभेची उमेदवारी मिळावी म्हणून २९ ऑगस्टला अर्ज दाखल केला आहे. पक्षप्रवेश व उमेदवारी बाबत पक्षाध्यक्ष शरद पवार व इतर नेत्यांनी भेट घेतली असल्याची माहिती श्री फड यांनी यावेळी दिली.

विद्यमान लोकप्रतिनिधीने गेल्या पाच वर्षात परळी विधानसभा मतदार संघासाठी काहीच केले नाही. इथल्या तरुणांना रोजगार मिळावा म्हणून एखादा प्रकल्पही येथे पालकमंत्र्यांना आणता आला नाही. परळी पालिकेसह मतदार संघात विविध विकास कामात अनेक कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप श्री फड यांनी केला. मतदार संघातील वाढत्या गुन्हेगारीला सत्ताधारी जबाबदार असून येथील शासकीय अधिकारी, कर्मचारी सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले झाले आहेत. पोलिसात सर्वसामान्यांची तक्रारही काही जणांना विचारल्या शिवाय घेतली जात नाही. तक्रार देण्यास गेलेल्या सर्वसामान्यांना पोलिस अधिकारी धमकावतात असा आरोप श्री फड यांनी केला.

आपण विधानसभेची निवडणूक लढवणारच असून मतदार संघातील सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणणार असल्याचे श्री फड यांनी स्पष्टपणे सांगितले. ***

# श्री गुरूलिंग स्वामींची परळीत निघाली पालखी; अखंड शिवनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

परळी वैजनाथ (बातमीदार):- वीरशैव लिंगायत समाज परळी व श्री गुरूलिंग स्वामी देवस्थानच्या वतीने दि.७ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या संतश्रेष्ठ श्री गुरूलिंग स्वामी यांच्या १२३ व्या पुण्यतिथी महोत्सव व अखंड शिवनाम सप्ताहाची शुक्रवार दि.१३ सप्टेंबर रोजी भक्तीपूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. यानिमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून पालखी काढण्यात आली.



शिवनामाचा एकच गजर, जागोजागी भाविकांकडून श्रीं च्या पालखीवर करण्यात आलेली पुष्पवृष्टी हे या पालखी सोहळयाचे वैशिष्टय असून आजच्या पालखी सोहळयाला शिवभक्तांची मोठी गर्दी झाली होती. सदगुरू श्री सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण सोहळा पार पडला. सप्ताहात त्यांचे आशिर्वचन पार पडले. आपल्या आशिर्वचनातून महाराजांनी सामाजिक, सार्वजनिक शांततेसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत व शरीर शुद्धीकरणासाठी शिवनाम जपावे असे सांगितले. यावेळी संतश्रेष्ठ गुरुलिंग स्वामी मठ बेलवाडी संस्थांचे अध्यक्ष दत्तापा ईटके गुरुजी वक्रेश्वर देवस्थान चे अध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे यांनी यावेळी आपले विचार मांडले.

यावेळी वक्रेश्वर देवस्थानच्या विश्वस्त पदी श्री श्याम बुद्रे प्रकाश खोत श्रीमती प्रेमला वेरुळे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला,अन्नदाते श्री चंद्रकांत आप्पा बुरांडे, शिवप्रसाद चौधरी, नागेश सुगरे, अविनाश चौधरी, विजय नरवणे, सुभाष चौधरी तसेच गुरुलिंग स्वामी मठ मंदिर स जीर्णोदरासाठी भाविक श्री सोमनाथ कुरमुडे महादेव इटके रमाकांत गुजर, सौ रमाताई आलदे सोमेश्वर बयाळे आदींचा गुरुवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी होते यावेळी श्री अँड गिरीश चौधरी, शंकर आप्पा उदगीरकर नारायणआप्पा खके चंद्रकांत आप्पा समशेट्टी मंदार नरवणे अक्षय मेनकुदळे शिवकुमार व्यवहारे आधी विश्वस्त उपस्थित होते यावेळी वर्गणी संकलन करण्यासाठी श्री महादेव ईटके, विकास हालगे, महेश निर्मळे, चंद्रकांत उदगीरकर, दत्तात्रय गोपानपाळे, सोमनाथ गोपानपाळे राजेश साखरे सर, राहुल कोदरे सचिन काटकर योगेश मेनकुदळे शिवकुमार चौंडे आदींचे गुरुवर्यांनी कौतुक केले.

वैद्यनाथनगरी परळी येथे बेलवाडी मंदिरात चालू असलेल्या श्री गुरूलिंग स्वामी यांचा १२३ वा पुण्यतिथी सोहळा व अखंड शिवनाम सप्ताहाची मंगळवारी भक्तीपूर्ण व उत्साहात सांगता झाली. मागील सात दिवसांपासून येथे अखंडपणे शिवनाम सप्ताह व धार्मीक कार्यक्रम चालू होते. दरम्यान आज सकाळी ९ वा. वैद्यनाथ मंदिर येथून संतश्रेष्ठ श्री गुरूलिंग स्वामी यांची पालखी काढण्यात आली. वक्रेश्वर मंदिर येथून पुढे शहरातील प्रमुख मार्गावरून शिवनामाचा गरज करीत पालखी मार्गस्थ होत गेली.श्री संत गुरुलिंग स्वामी महाराज पालखी सुरुवात वैजनाथ मंदिर, देशमुखपार, अंबेवेस, गणेशपार, नांदूरवेस, गोपनपाळे गल्ली, आंबेवेस, भोई गल्ली मार्गे बेलवाडी येथे प्रवचन, आरती व महाप्रसादाने सांगता झाली. जागोजागी भाविकांकडून पालखीतील श्रीं चे दर्शन करण्यासोबतच पुष्पवृष्टी केली जात होती. ओम नमः शिवायचा जप, मन्मथस्वामी व गुरूलिंग स्वामींचा जय जय जयकार जागोजागी केला जात होता.

वीरशैव लिंगायत समाज बांधवांचा आजच्या पालखी सोहळयात सक्रीय सहभाग होता. दोन वर्षांच्या कालखंडानंतर पालखी सोहळा झाल्याने सर्वांनाच हा सोहळा भव्य दिव्य व्हावा असे वाटत होते. त्याची प्रचितीही यावेळी ठिकठिकाणी पहायला मिळाली. मागील सात दिवस अखंड शिवनाम सप्ताहात विविध धार्मीक कार्यक्रम पार पडले. दररोजची आरती आणि महाप्रसादही अखंडपणे चालूच होता. आजच्या पालखी सोहळयात वीरशैव समाजातील सर्व महिला पुरुष व सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन स्वामी व आभार प्रदर्शन अँड गिरीश चौधरी यांनी केले. ***

नोंदणी क्र.बीएचआर/एजेआय/आरएसआर/५८८/२००४

## श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड

## २०वी वार्षिक सर्वसाधारण सभा

(फक्त सभासदांसाठी)

श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित परळी वैजनाथ च्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची २०वी वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २५.०९.२०२४ रोजी सकाळी ठिक ११-०० वाजता** पतसंस्थेच्या कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष **मा.लक्ष्मण ईश्वर वाकडे** यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे. तसेच खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात येतील.

सदरील सभेत खालील विषयावरचर्चा होऊन निर्णय घेण्यात येणार आहेत.

**सभेपुढील विषय**

(१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(२) दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२४ रोजी संपलेल्या आर्थीक वर्षाचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक व तेरीजपत्रकास मान्यता देवून जमा खर्चास मान्यता देणे.
(३) सन २०२३-२४ च्या वार्षिक अहवालास मान्यता देणे.
(४) सन २०२३-२४ चा लेखा परिक्षण अहवाल वाचून ऑडीट दोष दुरूस्तीस मान्यता देणे.
(५) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
(६) सन २०२४-२०२५ या अगामी वर्षाच्या जमा खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
(७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ : **परळी वैजनाथ**
दिनांक : **१०.०९.२०२४**

सचिव
**मुंदडा सचिन ब्रीजलाल**
श्री स्वामी समर्थ नागरी सह.पतसंस्था म.
परळी वैजनाथ जि.बीड

**विशेष सुचना** :-

१) संस्थेच्या सभासदास सरलेल्या आर्थीक वर्षाची माहिती हवी असल्यास दि.२०.०९.२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात विचारणा संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत करावी.
२) महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार आवश्यकता असलेली गणसंख्या सभेच्या प्रारंभी नसेल तर सभा अर्धातास तहकुब करून कामकाज सुरू केले जाईल. यास गणपुर्तीची गरज असणार नाही.

**स्थळ :- पतसंस्थेचे कार्यालय, मुंदडा निवास, घरनीकर गल्ली, परळी वै.जि.बीड**
**वेळ :- बुधवार २५.०९.२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता**

**सुविचार :–** उघडून वाचल्याशिवाय पुस्तक कळत नाही आणि समजून घेतल्याशिवाय माणूस कळत नाही.

संपादकीय...

## पालिकेचा गैरकारभार चव्हाट्यावर...

१९५३–५४ या साली म्हणजे सुमारे सत्तर वर्षापूर्वी स्थापन झालेली परळी पालिका मराठवाड्यातील अग्रगण्य पालिका म्हणून ओळखली जाते. गेल्या सत्तर वर्षात या पालिलेवर विविध पक्षाच्या नेत्यांनी सत्ता गाजवलेली आहे. शिवाय मुदत संपल्यामुळे व इतर कारणामुळे पालिकेवर प्रशासकही दीर्घकाळ राहिलेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता मागच्या अनेक वर्षापासून या पालिकेवर आहे. आता सत्तेची मुदत संपल्यामुळे पालिकेवर प्रशासक आहे. राज्यातील पालिकेच्या निवडणुका रखडल्याने प्रशासकच अनेक पालिकांचा कारभार गेल्या अनेक महिन्यांपासून पाहत आहे. भ्रष्ट व निष्क्रीय अधिकाऱ्यांमुळे पालिकेच्या कारभाराचा अनेक ठिकाणी बोजवारा उडाला आहे. 'मिळेल तेवढे खाऊ' ही भूमिका घेतल्याने या स्थानिक स्वराज्य संस्था भ्रष्टाचाराचे कुरण होऊन बसल्याचे दिसते आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांसाठी पालिकांना सध्या मोठ्या प्रमाणात निधी येतो आहे. या निधीचा उपयोग विकास योजना राबवताना प्रभावीपणे होताना दिसत नाही. या योजना म्हणजे अनेकांचे 'दाम कमवण्याचे' साधन होऊन बसल्या आहेत, असे दिसते व तशा तक्रारीही केल्या जात आहेत.

गेल्या काही दिवसांपासून परळी पालिकेच्या कारभाराबाबतही शहरात ओरड सुरू आहे. परंतु या विरुद्ध मोठा संघर्ष होताना दिसत नाही. विरोधकांचा म्हणावा तसा व तेवढा प्रभाव राहिला नाही. 'जाऊ द्या आपल्या काय करायचय!' अशी भूमिका अनेकजण घेताना दिसतात. काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी गेल्या काही वर्षात पालिकेच्या कारभाराबाबत आवाज उठवला. विकास योजनांचा बोगसपणा याबाबत संबंधितांकडे अनेक तक्रारी दाखल केल्या. परंतु काहीच होत नाही व या तक्रारीमुळे ठोस काही झालेही नाही. यामुळे 'काहीही करा आपले काहीच होत नाही!' या मस्तीत आणि धुंदीत येथे अनेकजण आहेत.

रासपचे माजी प्रदेशाध्यक्ष, युवक नेते व परळी तालुक्यातील कन्हेरवाडी गावचे सरपंच राजाभाऊ फड यांनी गेल्या रविवारी (ता.१५) पत्रकार परिषद घेऊन परळी पालिकेचा भ्रष्ट आणि अंधाधूंद कारभार चव्हाट्यावर आणला. विकास योजनातील भ्रष्टाचार, बोगसगिरी, ठराविक लोकांनाच दिली जाणारी विकास कामाची कंत्राटे, काही अधिकाऱ्यांची मनमानी, कागदोपत्री योजना दाखऊन लाटलेला मलिदा, शंभर कोटी रुपयांच्या गटार योजनेची लागलेली वाट, तीर्थक्षेत्र योजनेच्या कामातील गैरप्रकार अशा कितीतरी बाबींवर श्री फड यांनी या पालिकेतील भ्रष्ट कारभार पत्रकारांपुढे मांडला. या कारभाराची चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली. परळी पालिकेचा गैरकारभार व भ्रष्टाचाराविरुद्ध आपण मुंबई उच्च न्यालयात दाद मागणार आहोत व रस्त्यावर उतरुन आंदोलन करणार आहोत असा इशाराही त्यांनी दिला. श्री फड यांनी घेतलेली ही भूमिका शहरात चर्चा सुरू करुन गेली आहे. श्री फड यांच्या या भूमिकेचे व सुरू केलेल्या आंदोलनाचे पुढे काय होईल हे दिसणार आहे. परंतु या निमित्ताने परळी पालिकेचा कारभार सर्वांपुढे आला आहे. मनमानी करणारे निष्क्रीय व भ्रष्ट अनेक अधिकारी त्यांचा कारभार याबाबत अनेक परळीकरही त्रस्त आहेत. विकास कामांकडे दूर्लक्ष, शहरातील वाढती अतिक्रमणे, रस्त्यावर महिनोन् महिने पडलेले बांधकाम साहित्य, अस्वच्छता, तुंबलेली गटारे, पाणी पुरवठ्यातील अनियमिता याबाबत अधिकाऱ्यांचे दूर्लक्ष व बेजबाबदारपणा परळीकर पहात आहेत. याबाबत वरिष्ठांनी लक्ष घालून पालिकेचा कारभार सुधारण्याची गरज निर्माण झाली आहे. ***

# हैदराबाद मुक्तीसंग्राम आणि नेहरू...

हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९५२ च्या दिवाळी अंकामध्ये लिहिलेले आहे; की हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा लढा हा महात्मा गांधींनी भारताच्या स्वातंत्र्याविषयी जी चैतन्याची लाट पूर्ण भारतात निर्माण केली होती; त्याचा एक भाग होता. आणि नेहरूंच्या विचारांचा माझ्यावर प्रभाव असल्यामुळे हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेतृत्व करण्यासाठी मी प्रभावित झालो. वल्लभ भाई पटेलापेक्षा नेहरूंच्या विचारांचा प्रभाव माझ्यावर अधिक होता; आणि नेहरूंच्या मार्गदर्शनाखालीच मी हा लढा दिला. उस्मानाबाद जिल्ह्याच्या हिप्परगा येथील एका शाळेत स्वामी रामानंद तीर्थ हे शिक्षक होते. नंतर आंबेजोगाई येथे ते आले व हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या सशस्त्र लढ्याचे नेतृत्व केले.

१९७२ ला भारतीय स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव साजरा झाला. त्यावेळी इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या. या रौप्य महोत्सवामध्ये हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य योध्यांना ताम्रपट देण्याचे जाहीर झाले. हे ताम्रपट स्वीकारण्याचे हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे जनरल सेक्रेटरी गोविंद भाई श्रॉफ यांनी नाकारले. कारण त्यावेळी हा हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणाचा लढा म्हणून हे ताम्रपट प्रदान करण्यात येणार होते. गोविंदभाई श्रॉफ यांचे म्हणणे असे होते की हा लढा विलीनीकरणाचा नसून भारतीय स्वातंत्र्य युद्धाचा एक भाग होता. कारण हैदराबाद स्वातंत्र झाल्याशिवाय प्रादेशिक एकताच निर्माण होणार नव्हती. त्यावेळचे उस्मानअली निजामचे हैदराबाद राज्य हे आंध्रप्रदेश; मराठवाडा; आणि कर्नाटकचे; गुलबर्गा, बिदर आणि विजापूर हे जिल्हे मिळून होते. पाकिस्तान, बांगलादेश हे भारताच्या मध्यात येत नाहीत; पण हैदराबाद मात्र दक्षिण भारताच्या मध्यभागातच येते; म्हणून हैदराबाद राज्य स्वतंत्र झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भारत स्वतंत्र होणारच नाही. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे जनरल सेक्रेटरी ताम्रपट घेण्यास नकार देत असतील तर, मी ही हे ताम्रपट स्वीकारणार नाही; असे त्यावेळचे आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री पी.व्ही नरसिंहराव यांनी पण सांगितले. त्यानंतर इंदिराजींनी हैदराबाद मुक्तिसंग्राम हा केवळ संस्थानाच्या विलीनकरणाचाच नाही; तर भारतीय स्वातंत्र्यलढ्याचाच एक भाग होता; हे मान्य करून तसे ताम्रपट प्रदान केले.

त्या काळातील जे विविध संस्थानिक होते, त्यांच्या विलीनीकरणाची जिम्मेदारी त्यावेळी महात्मा गांधींनी वेगवेगळ्या नेत्याकडे सोपवली होती. ओडिसा, आसाम, बिहार प्रांतातील संस्थाने स्वातंत्र्य भारतात विलीन करण्याचे काम राजेंद्र प्रसादजीच्या कडे सोपवले. काश्मीरचा प्रश्न नेहरूजींकडे सोपवला; तर हैदराबादचा प्रश्न मौलाना आजादांकडे सोपवला; पण मौलाना आजाद म्हणाले की हैदराबाद मधील मुसलमानांचा




माझ्यावर विश्वास नाही; आणि मी मुसलमान असल्यामुळे तिथल्या हिंदूचा माझ्यावर विश्वास नाही त्यामुळे महात्माजींनी हा प्रश्न १९३७ पासून १९४५ पर्यंत स्वतःकडेच ठेवला. आणि १९४५ नंतर हा प्रश्न नेहरूंकडे सोपवला.

**डॉ. सुरेशचन्द्र चौधरी**
परळी वैजनाथ.

भारत स्वातंत्र होईपर्यंत हा प्रश्न तात्विक दृष्टीने महात्माजींनी हाताळला; तर व्यवहारिक दृष्टीने अत्यंत मुत्सद्दीपणाने नेहरूंनी हाताळला. वल्लभभाईंनी शेवटी स्वातंत्र्यानंतर गृहमंत्री झाल्यामुळे तो प्रश्न पोलीस ॲक्शन करून कृतीने संपवला. मुंबईत झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये नेहरूजींनी असे जाहीर केले होते की; गरज पडल्यास आम्ही हैदराबादचा प्रश्न मिलिटरीचा वापर करून सोडवू. स्वातंत्र्यपूर्व काळातील निझामशी झालेल्या वाटाघाटी निजामला बाहेर देशातून स्वातंत्र्यानंतर शस्त्रास्त्रे मागवता आले नाहीत; म्हणून झेकोस्लोव्हाकियातून पोर्तुगीजांच्या ताब्यात असलेल्या गोव्यामध्ये, निजामसाठी जी शस्त्रास्त्र पाठवली; पण विमानवेधी तोफांसारखी अवजड शस्त्रास्त्रे विमानाने गोव्याहून हैदराबादला पाठवता आली नाहीत. स्वातंत्र्यानंतर स्वित्झरलँडच्या बँकेत असलेले वीसकोटी रू. निजामने पाकिस्तान सरकारकडे ट्रान्सफर करण्यासाठी प्रयत्न केले; पण नेहरूंनी ब्रिटिश सरकारला निक्शून सांगितले की तुम्ही जर विस कोटी रु. पाकिस्तानला पाठवू दिले तर, तुमचे भारताच्या बँकेत असलेले तुमचे तीनशे पंचेचाळीस कोटी रुपये आम्ही तुम्हाला परत करणार नाहीत; नेहरूंजींच्या या मुत्सद्दिगिरीमुळेच हे सारे शक्य झाले.

हैदराबादच्या मुक्तीचा प्रश्न स्वामी रामानंद तीर्थ यांच्याकडे महात्माजींनी सोपवला होता. स्वामींजी गांधीजींना भेटले; आणि हा प्रश्न सशस्त्र लढ्याशिवाय सुटणार नाही; असे सांगितल्यानंतर गांधीजींनी त्यांना तुम्हास योग्य वाटणारा निर्णय घ्या असे सांगितले होते. या सर्व पूर्वपिठिके नंतरच वल्लभभाईंना गृहमंत्री झाल्यानंतर पोलीस ॲक्शन करून हैदराबादचा प्रश्न मार्गी लावता आला. स्वामी रामानंदतीर्थांनी त्यांच्या पुस्तकात उल्लेख केला आहे की; भारताच्या स्वातंत्र्ययुद्धामध्ये सर्वात मोठा संघर्ष हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा होता. कारण पूर्ण स्वातंत्र्ययुद्धामध्ये दिड लक्ष स्वातंत्र्य सैनिक तुरुंगात गेले होते; तर हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये वीस हजार स्वातंत्र्य सैनिकांना तुरुंगवास भोगावा लागला. निजामाने हैदराबादेत इत्तिहादुल मुसल्मिन नावाची संघटना स्थापन केली होती. तिचा प्रमुख लातूरचा कासिम रझवी होता. त्याने हैदराबाद राज्यात हिंदूचा अतोनात छळ केला होता. या कासिमरझवीला हैदराबाद राज्याचा जनरल सेक्रेटरी अलीयावरजंग आणि निजाम अत्यंत मूर्ख समजत होते. त्याच्याकडे असलेल्या वक्तृत्वाच्या गुणामुळे त्याला संघटनेचा प्रमुख नेमले होते. कासिम रझीवाला मुसलमानांचे राज्य निर्माण

(उर्वरित पान २ वर)

'**परळी परिसर**' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
* वर्ष ०८ * अंक १९ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) मंगळवार, दि. १७ सप्टेंबर २०२४ * किंमत : २ रू.

(पान १ वरुन)...

**हैदराबाद मुक्तीसंग्राम आणि नेहरू**

करायचे होते; पण निजामाला हिंदू मुसलमान दंगली मध्ये किंवा मुसलमानांचे राज्य करण्यात रस नव्हता; तर त्याला हैदराबादला स्वतंत्र राज्य करण्यात रस होता. वल्लभभाईंनी केलेल्या पोलीस ॲक्शनच्या मागे निजाम आणि भारत सरकारमधे झालेल्या वाटाघाटीची फार मोठी पार्श्वभूमी आहे. हैदराबाद मधील मुक्तिसंग्रामाचा लढा स्टेट कॉंग्रेस कडून लढला गेला होता. महात्मा गांधींनी हैदराबादमध्ये, महाराष्ट्रात, कर्नाटकात आणि आंध्रात स्टेट कॉंग्रेसची स्थापना केली होती. आर्यसमाजाचे या मुक्तिसंग्रामामध्ये मोठे योगदान होते. लाला लाजपतराय; स्वामी श्ध्दानंद आणि बरेचसे आर्य समाजी कॉंग्रेसचे सदस्य होते. जालियनवाला बागेमध्ये तर लाला लाजपतरायांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतसरकार व निजामामध्ये बऱ्याच वाटाघाटी झाल्या होत्या; पण निजाम नेहमी वेळकाढूपणाचे धोरण ठेवून हैदराबाद राज्याला परराष्ट्राची मान्यता मिळवण्याच्या प्रयत्नात असे. त्या काळात आलियावरजंगप्रपोजल भारत सरकार समोर निजामाने पाठवले होते. या प्रपोजल मध्ये हैदराबाद स्वतंत्र भारतातील एक राज्य म्हणून राहील पण त्याची स्वायत्तता कायम राहील व भारत सरकारने त्यात हस्तक्षेप करू नये अशा अर्थाची कलमे होती. वल्लभभाई पटेलांनी त्या प्रपोजल वर स्वाक्षरी केली होती. याबद्दल कृष्णमेनन यांनी आश्चर्य व्यक्त केले होते आणि पटेल यांनी स्वाक्षरी केली म्हणून नेहरूंना नाईलाजाने त्यावर स्वाक्षरी करावी लागली परंतु नेहरूंनी त्यावर एक नोट लिहिली ती असे की ; पटेल यांनी यावर स्वाक्षरी केल्यामुळे मला केवळ नाईलाजाने ही स्वाक्षरी करावी लागत आहे. पण मी कधीही माझी स्वाक्षरी रद्द करू शकतो.

निजामाला विलीनीकरण शब्द नको होता; म्हणून त्याने स्टॅण्डस्टील , म्हणजे आहे तशी परिस्थिती ठेवण्यासाठी आग्रह धरला हे ही भारत सरकारने मान्य केले. या स्टॅण्डस्टील ॲग्रीमेंट वर सही करण्याची निजाम टाळाटाळ करत होता. २२ ऑक्टोंबर १९४६ रोजी पाकिस्तानच्या फौजा काश्मीरमध्ये घुसल्या. पूंछ भागात युद्ध झाले आणि पाकिस्तान सैन्य पराभूत झाले. ९ नोव्हेंबर १९४६ ला वल्लभभाईंनी पोलीस ॲक्शन करून ते संस्थान ताब्यात घेतले. या सर्व बाबींमुळे मुंबईत झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात नेहरूजींनी निजामला स्पष्ट बजावले होती की निजामाने बिनशर्त भारतात विलीन झालेच पाहिजे नसता जुनागढसारखेच होईल.

माउंटबॅटन सोबत झालेल्या चर्चेमध्ये नेहरूजींनी चर्चा करून; ब्रिटिश राज्य संपून भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश निर्माण झाले असे मान्य न करता; जुन्या ब्रिटिश इंडिया चे सर्व अधिकार भारताला मिळतील असा ठराव करून घेतला. असा ठराव केल्यामुळे जुन्या ब्रिटिशइंडियाचे पूर्ण अधिकार भारत सरकारला मिळाले आणि या कायद्यानुसारच निजामाला स्वतंत्रपणे परराष्ट्रांशी व्यवहार करता आला नाही आणि परराष्ट्रातून शस्त्रे आयात करता आले नाहीत. हा नेहरूंच्या दृष्टिकोनामुळेच वल्लभभाईंना पोलीस ॲक्शन करता आली व हैदराबादचे भारतात विलीनीकरण करता आले व भारताचे पूर्ण स्वराज्य स्थापन झाले. ****

# परळी औष्णिक विद्युत केंद्रात नवीन संच क्र.९ ची उभारणी होणारच; ना.धनंजय मुंडे

मुंबई (बातमीदार):- मराठवाड्याचे भूषण व परळीची अर्थवाहिनी असलेल्या परळी तालुक्यातील नवीन औष्णिक विद्युत केंद्रात नविन संच क्रमांक ९ हा यापूर्वीच मंजूर झालेला आहे . या संचाची उभारणी रद्द होणार नाही ,हा संच उभारावा यासाठी आपण शर्तीचे प्रयत्न करणार आहोत. असे राज्याचे कृषीमंत्री मंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, संच क्रमांक नऊ उभारण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध असून हा संच उभारणीस मान्यता देण्यात यावी, अशी मागणी आपण उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली असून यासंदर्भात लवकरच श्री फडणवीस यांची भेट घेणार आहेत.

मागील छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती. याबाबत महानिर्मितीने केलेल्या सर्वेक्षणानंतर पाणी, कोळसा इत्यादी गोष्टींची उपलब्धता नाही असा अभिप्राय महानिर्मितीच्या स्थानिक प्रशासनाने राज्य शासनास सादर केल्यामुळे नव्या संचाच्या उभारणीस अडचणी निर्माण होतील अशी शंका निर्माण झाली आहे.

मात्र परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रात पासून जवळ असलेल्या खडका बंधाऱ्यांमध्ये माजलगाव धरण व जायकवाडी धरण येथून पाण्याची कमतरता भासल्यास पाण्याचे आवर्तन घेता येते आणि असा प्रसंग पाच ते सहा वर्षात कधीतरी एखाद्यावेळी येतो मात्र पाण्याची कमी भासत नाही.

त्याचबरोबर नाशिक, भुसावळ, पारस ही औष्णिक केंद्र देखील कोळसा खानीपासून दूरच आहेत, मात्र इलेक्ट्रिक रेल्वेमुळे तिथे कोळसा लवकर पोहोचतो त्याच पद्धतीने परळीत देखील डबल ट्रॅक चे काम सुरू असून परळीत देखील रेल्वेने कोळसा पोहोचण्यास कोणतीही अडचण नाही. त्याचबरोबर परळी येथे औष्णिक विद्युत केंद्रात नवीन प्रकल्प उभारण्यासाठी वेगळी जागा विकत घेण्याची गरज नाही तसेच मनुष्यबळ उपलब्धी व कर्मचाऱ्यांच्या वसाहती हे देखील औष्णिक विद्युत केंद्र परिसरातच असल्याने त्या देखील जमेच्या बाजू असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. दोनच दिवसांपूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांच्या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत देखील धनंजय मुंडे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्रात नवव्या संचाच्या उभारणीचा मुद्दा उपस्थित केला होता तेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत लवकर सकारात्मक निर्णय घेऊ असाही शब्द दिला होता. त्यालाच अनुसरून धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे ही मागणी केली आहे.

दरम्यान परळीतील जुन्या औष्णिक विद्युत केंद्रातील संच क्र. १ ते ५ यांचे आयुर्मान संपल्याने ते स्क्रॅप केले असून त्याजागी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबतही शासन सकारात्मक आहे. नव्याने संच उभारणीसाठी स्थानिक प्रशासनाने काहीही अभिप्राय दिलेला असला तरीही आपण राज्य शासन स्तरावर ९वा संच उभारन्यास मंजुरी मिळवणार आहोत, त्यामुळे गैरसमज करून घेऊ नये, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. **

## मांडवा येथे पथ नाट्यातून सादर केली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेची जनजागृती

परळी वैजनाथ (बातमीदार):- तालुक्यातील मांडवा येथे सकाळी एक पथ नाट्याने जन जागृती अभियान अंतर्गत सादरीकरण केले व मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची जागृती करत महिलांना या योजनेचे महत्त्व पटवून दिले. सध्या महायुती सरकारने केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे जनजागृती अभियान बीड जिल्ह्यामध्ये जोरात सुरू आहे.

अंबाजोगाई तालुका व परळी तालुक्यातील अनेक गावांमध्ये हे पथक गावोगावी जाऊन मुख्यमंत्री लाडके बहीण योजनेची बीड जिल्हा प्रशासना कडूने मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. यात विविध महाराजाकडून गावो गावी कीर्तनाच्या माध्यमातून विविध ठिकाणी व ग्रामीण भागात गावो गावी बॅनर लावण्यात आले आहे. व एलईडी व्हॅन मधून व्हिडिओ द्वारे या योजनेची जनजागृती करण्यात येत आहे. पथनाट्याद्वारे जनजागृती नागरिकांना आकर्षित करत आहे यामुळे गावातील चावडीवर पथनाट्याच्या बाजूला नागरिक एकत्र होऊन या योजनेचे महत्त्व जाणून घेतले आहेत यामध्ये महिलांबाबत कमालीची उत्सुकता आहे. **

### श्री गणेशोत्सव विशेष

# परळीचा 'दक्षिणमुखी गणपती'



**देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून परळी वैजनाथ येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची भाविकांत ओळख आहे. वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात दक्षिणमुखी गणपतीचे मंदिर आहे. बिनासोंडेचा मल्लरुपातील हा गणपती जागृत देवस्थान व नवसाला पावणारा गणपती म्हणून भाविकांत ओळख आहे.**




परळी वैजनाथ शहरात विविध देव-देवतांची अनेक मंदिरे आहेत. त्यामुळे या नगरीला मंदिरांची नगरी म्हणून ओळखले जाते. परळीत श्री गणेशाची वैद्यनाथ मंदिर परिसरात दक्षिणमुखी गणेश मंदिर, हरिहर तीर्थावरील गणेश मंदिर अशी प्राचीन मंदिरे आहेत तसेच वैद्यनाथ मंदिरातही श्री गणेशाच्या मुर्त्या आहेत.

शहरातील कालरात्री देवी मंदिरात तसेच परिसरातील बटुभैरव येथेही श्री गणेशाच्या प्राचीन मुर्ती आहेत. तालुक्यातील नागापूर येथील नागनाथ मंदिरातही श्री गणेशाची भव्य मुर्ती आहे. शिवाय तालुक्यातील इतर ठिकाणीही गणपती मंदिरे आहेत. वैद्यनाथ मंदिरात श्री गणेशाच्या दोन मुर्ती आहेत. त्यातील पहिली मुर्ती नंदीच्या गाभाऱ्यात आहे. वैद्यनाथाचे दर्शन घेण्यापूर्वी भाविक नंदीच्या गाभाऱ्याजवळ असलेल्या या गणपतीचे दर्शन घेतात. वैद्यनाथाकडे (पश्चिमेला) मुख असलेल्या गणपतीचे दर्शन घेवून नंतर वैद्यनाथाचे दर्शन घेण्याची येथे प्रथा आहे. ही गणेश मुर्ती खूप प्राचीन आहे. त्यानंतर वैद्यनाथाचे दर्शन घेवून मुख्य गाभाऱ्यातून बाहेर पडल्यानंतर उजव्या हाताला गणपतीची मुर्ती आहे. तिचे तोंड पुर्वेला आहे. त्यानंतर हरिहर तीर्थातील पायऱ्यावर दक्षिणाकडे मुख असलेले श्री गणेशाचे प्राचीन मंदिर आहे. याशिवाय वैद्यनाथ मंदिराच्या पूर्वद्वाराजवळही श्री गणेशाची प्राचीन मुर्ती आहे. अशा श्री गणेशाच्या चार मुर्त्या वैद्यनाथ मंदिराच्या परिसरात आहेत. या चारही मुर्त्या प्राचीन असून वैद्यनाथाचे दर्शन घेणारे भाविक इतर देव-देवतांचे दर्शन घेण्याबरोबरच या श्री गणेशाचेही दर्शन घेतात. शहरातील संत जगमित्र नागा मंदिरातही श्री गणेशाचे छोटे प्राचीन मंदिर आहे. बोंबल्या गणपती या स्थानिक नावाने हा गणपती प्रसिद्ध आहे. त्याचे तोंड पुर्वेला आहे. परळी शहराचे वैशिष्ट्ये असे की, परळी वैजनाथ येथे श्री गणेशाच्या ज्या मुर्त्या आहेत. त्या मुर्त्यांची मुखे चारही दिशाकडे आहेत. शहरातील गणेशपार भागात श्री गणेशाचे प्राचीन मंदिर आहे. तर बस स्थानकात श्री गणेशाचे मंदिर बांधण्यात आले आहे. तर तालुक्यातील टोकवाडी येथे वरद विनायक मंदिर बांधण्यात आले आहे.

परळी शहरातील वैद्यनाथ मंदिर परिसरात संत गुरुलिंग स्वामी मंदिरासमोर दक्षिणमुखी बिनासोंडेच्या गणपतीचे प्राचीन मंदिर आहे. वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिरात दर्शनाला जाण्यापूर्वी भाविक या गणपतीचे दर्शन घेतात अशी येथे पध्दत आहे. या गणपतीचे दर्शन घेतल्याशिवाय वैद्यनाथाच्या दर्शनाचे समाधान भाविकांना मिळत नाही. मंदिर छोटे जरी असले तरी दगडी बांधकामाचे असून ते प्राचीन आहे. दैत्यराज विघ्नासुराच्या वधासाठी या गणेशाचा अवतार झाला असा उल्लेख 'परळी महात्म्य' या प्राचीन ग्रंथात आढळतो. पुराणात दक्षिण भारतामध्ये घनदाट अरण्य प्रसिध्द होती. त्यात नैमिषारण्य, दंडकारण्य आदींचा समावेश त्यात आहे. श्रीराम प्रभुंनी आपला चौदा वर्षाचा वनवास या दंडकारण्यात घालवला. याच दंडकारण्यात प्रभाकर क्षेत्र पुराण प्रसिध्द आहे. या ठिकाणी श्री वैद्यनाथाचा निरंतर निवास असतो. या क्षेत्री 'कांतीपुरी' नगरी (परळीचे जुने नाव) आहे. येथे श्री विघ्नहर्ता श्री गणेश अवतीर्ण होऊन त्यांनी दैत्याचा नाश केला. हा पार्वती कुमार कांतीपुरी नगरीमध्ये प्रसिध्दी पावला अशी कथा या स्थानाबद्दल सांगितली जाते. या गणपतीचे मुख दक्षिण दिशेला असल्यामुळे 'दक्षिणमुखी गणेश' म्हणून या नावाने हा भाविकांत ओळखला जातो. या मंदिराचा गाभारा छोटा असला तरी चिरेबंदी बांधणीचा व जुना आहे. या गाभाऱ्यात गणेशाची भव्य मुर्ती असून ती शेंदूर चर्चीत आहे. आता मंदिराबाहेर सभामंडप बांधण्यात आला आहे. परळीचे श्री. टिंबे हे या मंदिराचे पुजारी आहेत. दररोज नित्यनियमाने या ठिकाणी श्री गणेशाची अभिषेक पूजा केली जाते. दररोज सायंकाळी 'श्री' ची आरती व प्रसादाचा कार्यक्रम असतो. श्री गणेश जन्मोत्सव पारंपारिक पध्दतीने व मोठ्या थाटामाटात येथे साजरा केला जातो. भाद्रपद शु.चतुर्थीला (गणेश चतुर्थी) आणि माघ शु.चतुर्थीला (गणेश जन्म) असे दोनवेळा येथे उत्सव साजरे केले जातात. यावेळी महापूजा, कीर्तन व इतर धार्मिक कार्यक्रम होतात. गणेश जन्मादिनी श्री गणेशाला लघुरूद्राचा अभिषेक केला जातो. या धार्मिक कार्यक्रमात शेकडो भाविक सहभागी होतात. नवसाला पावणारा गणपती व जागृत देवस्थान म्हणून या स्थानाची ओळख आहे. चतुर्थीच्या दिवशी पहाटे पासून रात्री उशिरापर्यंत येथे भाविकांची दर्शनासाठी व श्रींचा अभिषेक करण्यासाठी रांगा लागलेल्या असतात. वैद्यनाथ देवस्थान संस्थेचे सचिव राजेश देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी या गणेश मंदिराचा संपूर्ण कायापालट करण्याचा निर्णय घेतला आहे.

**- लक्ष्मण वाकडे (पत्रकार)**
परळी वैजनाथ.